# दुय्यम निबंधक कार्यालय
# शोध उपलब्ध करणे
# सनद 1.4

## अ) दुय्यम निबंधक कार्यालयात शोध घेण्यासाठी पक्षकारांकडून करावयाची कार्यवाही

1. दुय्यम निबंधकांकडे अर्ज करणे त्या अर्जामध्ये-
   अ) मिळकतनिहाय शोध घ्यावयाचा असल्यास मिळकतीचे गाव व मिळकत क्रमांक नमूद करणे किंवा पक्षकारनिहाय शोध घ्यावयाचा असल्यास त्या व्यक्तीचे नाव नमूद करणे
   ब) कोणत्या कालावधीतील दस्तांचा शोध घ्यावयाचा आहे तो कालावधी नमूद करणे
2. अनुज्ञेय शोध फी भरणे

## ब) दुय्यम निबंधक कार्यालयात शोध घेण्यासाठी दुय्यम निबंधकाकडून करावयाची कार्यवाही

1. यथोचित अर्ज दाखल करुन घेणे
2. अर्जात नमूद मिळकतनिहाय किंवा नावनिहाय शोधासाठी प्रति वर्ष रूपये 25/- प्रमाणे शोध फी स्वीकारणे
3. अर्जात दस्त क्रमांक नमूद असल्यास प्रति दस्त रूपये 25/- प्रमाणे शोध फी स्वीकारावी
4. स्वीकारलेल्या रकमेची पावती देणे
5. अर्जात नमूद कालावधीतील मिळकतनिहाय किंवा नावनिहाय दस्तांचे अभिलेख पाहणीसाठी उपलब्ध करुन देणे

एखाद्या मिळकतीसंदर्भात दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी झालेल्या दस्तांच्या सूचींची पाहणी करण्यासाठी दुय्यम निबंधक कार्यालयात न येता, इंटरनेटद्वारे घरबसल्या पाहणी करणे